चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१३ मार्च, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ऐतिहासिक गायत्री शक्तीपिठ मंदीरातील चोरी २४ तासात केली उघड

## ➤ मुददेमालासह ३ आरोपी गजाआड

दिनांक १२/०३/२०१९ रोजी पोलीस स्टेशन रामनगर अंतर्गत ऐतीहासीक गायत्री शक्तीपिठ येथील मंदीरात चोरी झाल्याने अज्ञात आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन रामनगर येथे अपराध क. २९१/२०१९ कलम ४५७, ३८० भादंवि चा गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून सदर गुन्हा उघउकीस आणण्याचे दृष्टीने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने माहिती काढण्यास सुरूवात केली. काही तासातच स्थानिक गुन्हे शाखेस मिळालेल्या गोपनीय माहितीवरून समाधी वार्ड चंद्रपूर येथे राहणारा आरोपी नामे १) वैभव दिलीप जातेगावकर यास ताब्यात घेवून सखोल विचारपुस केली असता, त्याने मंदीरातील चोरी ही तो आणि त्याचे साथीदार यांनी मिळुन केल्याची कबुली दिल्याने आरोपी नामे २) आकाश केशव दखणे रा. गोपालपुरी हनुमान मंदिर चंद्रपूर + १ यांना अटक करण्यात आली आहे. आरोपींतांकडुन मंदिरातील मुर्तीचे डोक्यावरील चांदीचे झुंबर, दानपेठीतील नगदी २३८०/— रू व गुन्हयात वापरलेली हिरो होन्डा स्प्लेंडर क. एमएच—३४—एएच—७७८९ असा मुददेमाल २४ तासातच ताब्यात घेण्यात आला आहे. सदर गुन्हयातील तिन्ही आरोपीतांना अटक कण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन रामनगर हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर, डॉ. श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, स्थागुशा चंद्रपूर यांचे नेतृत्वात सफौ पंडीत वऱ्हाटे, नापोशि चंदू नागरे, नापोशि अविनाश दशमवार, नापोशि जमिल खान पठाण यांनी पार पाडली.

———————————————————————————————